**अतित्वर्य/महत्वाचे** पुणे महानगरपालिका

**आजचे आज वाटणे** *** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २४**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. ९/९/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. ९७८**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/८/२०१९ ते दि.२५/८/२०१९ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/२३३३ दि. २९/८/२०१९ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ९७९**

मा.संजय घुले यांचे दि. ४/९/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. २६ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थाशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | पुणे मनपा सन २०१९-२० चे अंदाजपत्रक पान क्र.१७६ अ.क्र.२१६ बजेट कोड :- CE20A1249/SA6-516 प्रभाग क्र.२६ ड मध्ये वाडकर मळा ते देसाई हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता विकसित करणे. | ५० लक्ष | --- |
| | नविन सुचविलेली कामे- | | |
| १ | प्रभाग क्र.२६ ड मधील आनंदनगर, पोस्टमन कॉलनी येथे ड्रेनेज लाईन व कॉक्रीटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.२६ ड मधील संकेतनगर व साठे नगर येथे कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.२६ ड मधील तरवडे वस्ती व प्रभागामध्ये विविध ठिकाणी कॉक्रीटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.२६ ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती करणे. | --- | १० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.२६ ड मध्ये विविध ठिकाणी चेंबर मधील गाळ काढणे व ग्रॅप मशीन च्या सहाय्याने साफसफाई करणे. | --- | १० लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ९८०**

मा.रफिक शेख व मा.अजित दरेकर यांचे दि. ४/९/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.१९ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणेसाठी र.रू.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, प्रभाग क्र.२८ब मध्ये स.नं.४८९ विद्यासागर कॉलनी येथील उद्यानामध्ये हॉर्टीकल्चर विषयक कामे करणे | २५ लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम - | | |
| प्रभाग क्र.१९ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ९८१**

पुणे मनपाकरीता कचरा वाहने चालविण्यासाठी ठेका पद्धतीने वाहनचालक सेवक पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री एंटरप्रायजेस, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९५,३३,९३०/- पेक्षा ९.९९% जादा) असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/३२० दि. ३/९/२०१९ चे पत्र.

१) मे.श्री एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (९.९९% जादा) रक्कम रु.१६,४४,७२,३६९=६० (अक्षरी रक्कम रुपये सोळा कोटी चव्वेचाळीस लाख बाहत्तर हजार तीनशे एकोणसत्तर पैसे साठ फक्त) पर्यंत तसेच शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नविन वाढीव डीए (महागाई भत्त्या) सह आदा करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस.

२) पुणे मनपाकडील कचरा वाहने चालविण्यासाठी ठेका पद्धतीने वाहनचालक सेवक घेणेकामी सध्या जीएसटी लागू नाही परंतु भविष्यात जीएसटी लागू झाल्यास जीएसटी पोटी देय रक्कम आदा करणेस.

**विषय क्र. ९८२**

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालये,मंडई,मनपा भवन,मध्यवर्ती कोठी,कर्मशाळा,मोटार वाहन विभाग,कचरा हस्तांतरण केंद्र,इत्यादी ठिकाणी सुरक्षा विभागामार्फत ''बहुउददेशीय कामगार''पुरविणे (टेंडर ०१/२०१९) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि.यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस व बिल आदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/३२२ दि. ३/९/२०१९ चे पत्र.

१ आवश्यक खाजगी सुरक्षा रक्षक यांची संख्या पुर्नविचार करणेकरीता मा. तांत्रिक समितीची मान्यता चे अधीन राहून प्रस्तावित विषयाला मान्यतेस हरकत नाही.

२ पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालये व इतर महत्वाच्या ठिकाणी मे. सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडून प्रति मदतनीस प्रतिमहा र.रू.१३६२४.७६/- या दराप्रमाणे १३५० खाजगी 'बहुउददेशीय कामगार' उपलब्ध करून घेण्यास व १२महिन्यांमध्ये र.रु. २२,०७,२१,१०९.५७ (अक्षरी - बावीस कोटी सात लाख ऐकवीस हजार ऐकशे नऊ रुपये सत्तावन्न पैसे फक्त सर्वकरासह) आदा करणेस.

३ त्या अनुषंगाने मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. संस्थे समवेत करार करणेस

४ सदर संस्थेस मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुदीमधील अर्थशिर्षकामधून बिले आदा करण्यास या संपूर्ण कामासाठी र.रु.२२,०७,२१,१०९.५७ (अक्षरी - बावीस कोटी सात लाख ऐकवीस हजार एकशे नऊरुपये सत्तावन्न पैसे फक्त सर्वकरासह) खर्च करणेस

५ दि.१/०४/२०१९ ते दि.३१/०७/२०१९ किंवा नविन वर्क ऑर्डर देईपर्यंत मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. संस्थे समवेत करारनामा करणेस व अंदाजपत्रक सन २०१९-२० मधील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे अर्थशिर्षकामधुन रक्कम रु.६,९९,०३,७५६/- बिले आदा करणेस

६ शासना कडून किमान वेतन दर व विशेष भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या वाढीसह संबंधीताना बिले आदा करणेस

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ९८३**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९८४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९८५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९८६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९८७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९८८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९८९**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९९०**

पुणे पेठ पर्वती टि.पी.एस – ३, फा.प्लॉट नं. ५७१ ब पैकी व फा.प्लॉट नं. ५७२ अ पैकी या मिळकतीवरील प्राथमिक शाळेसाठी सुरु असलेली भूसंपादन प्रक्रिया कायमस्वरुपी रद्द करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१०४ दि. १९/६/२०१९ चे पत्र.

१) महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र. मआ/एलएक्यु/ओ/९६८ दि.२३/०१/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीचे मान्यतेसाठी सादर केलेले विषयपत्र मागे घेणेस.
२) पुणे पेठ पर्वती टि.पी.एस – ३ ,फा.प्लॉट नं. ५७१ ब पैकी व फा.प्लॉट नं. ५७२ अ पैकी या मिळकतीवरील प्राथमिक शाळेसाठी सुरु असलेली भूसंपादन प्रक्रिया कायमस्वरुपी रद्द करणेस व त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९९१**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील सन २०१९-२० चे 'क' अंदाजपत्रकातील महसूली कामातील शिल्लक रक्कमेतून पाणी पुरवठा महसूली व भांडवली कामांच्या करावयाच्या अत्यावश्यक कामांसाठी र.रुपये ३७९५.०० लक्ष मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापु/२५१ दि.१९/८/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९९२**

भारती विद्यापीठ संस्थेला कात्रज तलावातून दररोज २०० कि.लि. पर्यंत पाणीपुरवठा करणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या करार पत्रानुसार खालील अटी शर्तीस अधिन राहून भारती विद्यापीठ संस्थेस पाणी पुरवठा करणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/२९२ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

१. कात्रज तलावातून भारती विद्यापीठ संस्थेस दररोज २०० कि.लि. पर्यंत पाणीपुरवठा करणेस व वेळोवेळी ठरलेल्या दराप्रमाणे व खपाप्रमाणे संस्थेकडून मीटरप्रमाणे बिल वसूल करणेस.
२. नळ कनेक्शन पोटी कायमस्वरूपी आकार र.रू.९३,३८५(अक्षरी-र.रू.त्र्याण्णव हजार तीनशे पंच्याऐंशी फक्त) भरून घेणेस
३. दि.१/६/२०१९ पासून ते दि. ३१/५/२०१९ पर्यंत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेल्या अटी शर्तीप्रमाणे भारती विद्यापीठ संस्थे बरोबर करार करणेस.
४. रॉ वॉटर पिण्यास वापरता येणार नाही. सदर पाणी पिण्यासाठी वापरल्यास पुणे मनपाची जबाबदारी राहणार नाही,
५. महाराष्ट्र शासन नविन धोरणानुसार पाणी वापराबाबत काही बदल झाल्यास व नविन काही चार्जेस शासनास अदा करावयाचे झाल्यास ते भारती विद्यापीठ संस्थेमार्फत अदा करणेत येतील त्याची सर्वस्वी जबाबदारी भारती विद्यापीठ संस्थेची राहील,
६. पुणे मनपामार्फत सदरील चार्जेसमध्ये वाढ झाल्यास ते भरणे भारती विद्यापीठ संस्थेवर बंधनकारक राहील,

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९९३**

Extended Selection of Consultant for advisory support for strategic road map and implementation support for solid waste management department of PMC for a period of 2 Years या कामासाठी 'अर्नेस्ट अँड यंग एल एल पी' कंपनीचे निविदेस जून २०१९ अखेरपर्यंतच्या वाढीव मुदतीकरता पूर्वी मान्य झालेल्या निविदा दरानुसार (निविदा क्र.१००-२०१६) देयक अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/३०० दि.२७/८/२०१९ चे पत्र.

१.माहे २६ डिसेंबर २०१८ ते २६ जुन २०१९ अखेरपर्यंतच्या या वाढीव मुदतीकरीता अर्नेस्ट अँड यंग एल एलपी यांना सदर कामासाठी पूर्वी मान्य झालेल्या निविदा दरानुसार बिल रकमेचे र.रू.८,२९,०९०/- प्रति महिना X ६ महिने= र.रू.४९,७४,५४०(अक्षरी र.रू. एकोणपन्नास लक्ष चौ-याहत्तर हजार पाचशे चाळीस फक्त)अदा करणेस,

२.घनकचरा विभागातील RE19A158 प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट स्थापन करणे व CE19A169स्वच्छ भारत अभियान मनपाचा हिस्सा या अर्थशिर्षकामधून खर्च करण्यास.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ४/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ९९४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/३१७ दि.३/९/२०१९ चे पत्र.

१. कर आकारणी व करसंकलन कार्यालयाकडून यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली निवासी कराची २० प्रकरणे व त्यांची माहे मार्च २०१९ अखेरची थकबाकी व २०१९–२० ची मागणी अशी एकूण रक्कम रुपये ३,३२,३०,४७७/– निर्लेखित करणेबाबत कागदपत्राची तपासणी करण्यात आली असून मिळकतकर रक्कम निर्लेखित करणे बाबत कार्यवाही करणेस.

२. सदरची निवासी कराची २० प्रकरणे निर्लेखित केल्यानंतर नव्याने निर्लेखित करावयाच्या प्रकरणांची कागदपत्र तपासून, जागा तपासणी करुन प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करुन त्याचा अहवाल मा.स्थायी समितीस मान्यतेसाठी सादर करणेस.

**विषय क्र. ९९५**

इंन्सिनेरेटर प्लांट मध्ये मृत प्राणी तसेच अन्य जैविक कच–याची विल्हेवाट लावण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३३३ दि. ३/९/२०१९ चे पत्र.

१)पाळीव मृत कुत्रा व मांजर यांची इंन्सिनेरेटर प्लांटमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी र.रू. २०००/– प्रत्येकी हा दर आकारण्यास

२)पाळीव मोठी मृत जनावरे यांची इंन्सिनेरेटर प्लांटमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी र.रू. ३०००/– प्रत्येकी हा दर आकारण्यास

३)पाळीव मृत प्राण्यांसाठी इंन्सिनेरेटर प्लांटमधील दहना व्यतिरिक्त सरसकट र.रू. २००/– वाहतूक खर्च आकारणेस

४) सर्व भटक्या मृत जनावरांची तसेच मटण मार्केटच्या वेस्टची इंन्सिनेरेटर प्लांटमध्ये मोफत विल्हेवाट लावण्यास.

५)पोर्क वेस्टची विल्हेवाट र.रू. २५/– प्रतिकिलो प्रमाणे आकारणेस व त्याची वसुली व भरणा घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करणे.

**विषय क्र. ९९६**

पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता मे.आकार अभिनव कन्सल्टंट प्रा.लि. यांचे मा.स्थायी समिती ठराव क्र. १६०४ दि. ११/१२/२०१२ च्या ठरावामध्ये बदल करुन मे.आकार अभिनव कन्सल्टंट प्रा.लि. प्रोजेक्ट र.रुपये ५०.०० कोटीवरील वर्ग (IV) मध्ये नाव समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३३९ दि. ३/९/२०१९ चे पत्र.

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**